<u>रे.मु.नं. ५/२०२६ मधील नि.१४ व १६ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी विरुध्द प्रतिवादीने दाखल केलेला प्रतिदावा व त्याच्या नोंदणीबाबत आक्षेप असल्याबाबत दाखल केला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी नं.१ ते ७ यांनी कैफियत दाखल केली असुन कैफियती सोबत वादीविरूध्द व इतर नविन प्रतिवादीविरूध्द प्रतिदावा दाखल केला आहे. वास्तविक पाहता कायदयाने दाव्यातील पक्षकारा व्यतिरिक्त इतर नविन पार्टीविरूध्द प्रतिदावा दाखल करता येत नाही. त्यामुळे वादीने प्रतिवादीने दाखल केलेला प्रतिदाव्याची नोंदणी करणेबाबत आक्षेप घेतला आहे.

३. प्रतिवादी याने प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले असुन त्यांनी वादीने अर्जा सोबत प्रतिज्ञापत्र दाखल केले नाही व सदरचा अर्ज सी.पी.सी ऑर्डर ८ रूल ६ मधील तरतुदीनुसार नाही. त्यामुळे रद्द करावा, असे नमुद करून प्रतिदावा दाखल झाला तर वेगवेगळे दावे दाखल करण्याची आवश्यकता नाही व प्रतिदावा हा मुळ दाव्यातील वादीविरूध्द असल्यामुळे कायदेशीर आहे. त्यामुळे प्रतिदावा नोंदणी करण्याची विनंती केली आहे.

४. वादीने त्याच्या कथनाच्या पृष्ठर्थ अभिलेखावर खालील न्यायनिवाडा दाखल केला आहे -

1) Sanjay Tiwari Vs. Yugal Kishore Prasad Sao & Ors
2026 SAR (Civ)38 .

तर प्रतिवादींनी त्यांच्या कथनाच्या पुष्ठर्थ खालील न्यायनिवाडे दाखल केले आहेत -

1) Gurbachan Singh Vs. Bhag Singh & Ors
AIR 1996 Supreme Court 1087.

2) Sheshrao s/o Bhauraosable Vs. Ganesh s/o Mahadeoraosable
2006 (3) BCJ 23.

3) Shamrao Sitaram kadam Vs. Tukaram Savala Jadhav
2020 (2) Mh.L.J.

PRANITA RITESH SUGAONKAR Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR Date: 2026.03.23 15:37:44 +0530

५. वरील सर्व न्याय निवाडे विचारात घेतले. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतच्या दाव्याचे व प्रतिदाव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने प्रस्तुतचा दावा हा मौजे लोहगाव येथील शेत जमीन मिळकत गट नं.२३/३ क्षेत्र ०हे.७३ आर बाबत निरंतर ताकिद मनाई हुकुमासाठी दाखल केला आहे. याउलट प्रतिवादीने प्रतिदावा हा मौजे लोहगाव येथील गट नं. २३ क्षेत्र ३ हे. ८६ आर पोट खराबा ०. ०२ आर बाबत दाखल केला असुन त्यामध्ये

गट नं. २३ चे गट नं.२३/१, २३/२, २३/३, २३/४, २३/५ असे झाल्याचे नमुद केले आहे. तसेच वादीने ज्या दस्त नंबर ३७७१/२०२५ अन्वये तो मालक झाल्याचे तो दाव्यामध्ये नमुद करीत आहे, तोच दस्त प्रतिवादी हा प्रतिदाव्यामध्ये वादीच्या हिश्यावर बंधनकारक नाही असा जाहीर ठराव मागत असल्याचे दिसुन येते. अशा प्रकारे प्रस्तुत दावा व प्रतिदाव्यातील मिळकत ही एकच असुन त्यातील खरेदी दस्त नं.३७७१/२०२५ बाबतची मागणी ही संबंधीत असल्याचे दिसुन येते. पुढे वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादीस दाव्यातील पक्षकारा व्यतिरिक्त इतर नविन पार्टी विरूध्द प्रतिदावा दाखल करता येत नाही. परंतु सी.पी.सी ऑडर ८ रूल ६ -अ चे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रतिदावा दाखल करीत असतांना फक्त वादीच पार्टी असावा असे कुठे ही बंधन नमुद नाही. त्यामुळे वादीचे सदरील कथन विचारात घेता येणार नाही, असे माझे मत आहे. त्यामुळे मला असे वाटते की, दावा व प्रतिदावा यातील मिळकत एकच असल्यामुळे व दोन्ही दाव्यातील मागण्या या एकमेकांशी संलग्न असल्यामुळे दोन्ही दाव्याचे योग्य ते निराकरण होण्याकरीता व वेगवेगळया दाव्याची संख्या टाळण्याकरीता प्रस्तुतचा प्रतिदावा नोंदणी करणे योग्य असेल. त्यामुळे मी खालील आदेश पारित करीत आहे -

आदेश

| | |
|---|---|
| १. | वादीचा प्रतिदावा नोंदणी करणेबाबतचा आक्षेप खारीज करण्यात येतो. |
| २. | प्रतिवादीचा प्रतिदावा हा नियमानुसार नोंदणी करण्यात यावा. |

PRANITA RITESH SUGAONKAR

Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR
Date: 2026.03.23 15:37:49 +0530

**(श्रीमती.डॉ. पी. आर. सुगांवकर)**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, नेवासा.
ता.नेवासा, जि.अहमदनगर.

दि.२३.०३.२०२६